# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक-ल

वर्ष १, अंक ३५] सोमवार, जुलै २०, २००९/आषाढ २९, शके १९३१ [पृष्ठे ४

किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक १३४

## प्राधिकृत प्रकाशन

(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० जुलै २००९

### अधिसूचना

**किमान वेतन अधिनियम, १९४८.**

क्रमांक किवेअ. १२२००८/प्र.क्र.१०७२/काम-७.– ज्याअर्थी, शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या अधिसूचना क्रमांक/एमडब्ल्यूए.१०२००१/सीआर-८६४/काम-७, दिनांक २३ मे २००२ नुसार महाराष्ट्र शासनाने किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा ११) (यात यापुढे ज्याचा "उक्त अधिनियम" असा उल्लेख करण्यात आला आहे.) अंतर्गत विशेष आर्थिक क्षेत्रातील अनुसूचित उद्योगाकरिता विकास आयुक्त, विशेष आर्थिक क्षेत्र यांची निरीक्षक म्हणून नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी, सिप्झ विशेष आर्थिक क्षेत्र, मुंबई येथील उप विकास आयुक्त आणि सहायक विकास आयुक्त यांनाही सिप्झ विशेष आर्थिक क्षेत्र, मुंबई या हद्दीतील अनुसूचित उद्योगाकरिता निरीक्षक म्हणून घोषित करणे संयुक्तिक असल्याने याद्वारे किमान वेतन अधिनियमाच्या कलम १९ च्या उपकलम-१ अन्वये शासनास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. एमडब्ल्युए-१०९२/(७३८६)/काम-७, दिनांक २४ फेब्रुवारी १९९४ चे अंशतः अधिग्रहण करून यासोबत जोडलेल्या अनुसूचीतील स्तंभ २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांची सिप्झ विशेष आर्थिक क्षेत्र, मुंबई, ज्याकरिता महाराष्ट्र शासन समुचित शासन आहे, या हद्दीत निरीक्षक म्हणून नेमणूक करीत आहे. ते अनुसूचीच्या स्तंभ २ मधील अधिकाऱ्यांसमोर स्तंभ-३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यक्षेत्रात कार्यरत राहतील.

अनुसूची

| अ. क्र. (१) | अधिकारी (२) | कार्यक्षेत्र (३) |
|---|---|---|
| १ | उप विकास आयुक्त, सिप्झ, विशेष आर्थिक क्षेत्र, मुंबई. | सिप्झ, विशेष आर्थिक क्षेत्र, मुंबई |
| २ | सहायक विकास आयुक्त, सिप्झ, विशेष आर्थिक क्षेत्र, मुंबई. | सिप्झ, विशेष आर्थिक क्षेत्र, मुंबई |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

बा. शि. वानखेडे,
शासनाचे उप सचिव.

of the said Act, in respect of the Scheduled Employments in the Santacruz Electronics Export Processing Zone, Special Economic Zone, Mumbai in relation to which the State Government is the appropriate Government and defines the local limits specified against them in column (3) of the said Schedule within which they shall exercise their functions.

*SCHEDULE*

| S.No. (1) | Officers (2) | Local limits (3) |
|---|---|---|
| 1 | Deputy Development Commissioners, Santacruz Electronics Export Processing Zone, Special Economic Zone, Mumbai. | Area of their respective jurisdiction within the Santacruz Electronics Export Processing Zone, Special Economic Zone, Mumbai. |
| 2 | Asstt. Development Commissioner, Santacruz Electronics Export Processing Zone, Special Economic Zone, Mumbai. | Area of their respective jurisdiction within the Santacruz Electronics Export Processing Zone, Special Economic Zone, Mumbai. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

B. S. WANKHEDE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.